बृहन्मुंबईमधील शासकीय कार्यालयीन जागांच्या प्रमाणकाचे सुसूत्रीकरण....

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परिपत्रक क्रमांक-एसीडी-१०८६/१११६६१/७०२/वि. व्या. [१]
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ नोव्हेंबर, १९८६.

पहा :- शासन परिपत्रक, इमारती व दळणवळण विभाग,
क्रमांक : एसीडी-३८६२/४६८४/ए, दि. २९. ३. १९६३.

परिपत्रक :- महाराष्ट्र शासनाच्या वाढत्या व्यापामुळे शासनाची कार्यान्वित होणारी नवीन कार्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बृहन्मुंबई मध्ये शासकीय कार्यालयीन जागांची असणारी कमतरता लक्षात घेता बृहन्मुंबईमध्ये शासकीय कार्यालयांना जागा उपलब्ध करणे कठीण झाले आहे. त्याचप्रमाणे शासकीय कार्यालयासाठी नवीन बांधण्यात येणाऱ्या इमारतींच्या खर्चात तसेच खाजगी जागा भाड्याने घेतांना भाड्यापोटी येणाऱ्या खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबईमधील शासकीय कार्यालयीन जागांच्या प्रमाणकाचे सुसूत्रीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन परिपत्रक क्र. एसीडी-३८६२/४६८४/ऐ, दिनांक २९ मार्च, १९६३ अन्वये काढण्यात आलेले आदेश निष्प्रभावित करून शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, बृहन्मुंबईमधील सर्व शासकीय कार्यालयीन जागांच्या प्रमाणकांत खालीलप्रमाणे सुसूत्रीकरण करण्यात येत आहे.

| | नवीन प्रमाण<br>चौ. फूट |
|---|---|
| १] कार्यालय प्रमुख वर्ग-१ उच्चश्रेणीचे राजपत्रित [सचिवांच्या दर्जाचे अधिकारी] [अभ्यागत कक्ष व समिती कक्ष धरून] | २०० + १५० = ३५० |
| २] सह सचिव, उप सचिव दर्जाचे वर्ग-१ श्रेणीचे अधिकारी | १५० |
| ३] अवर सचिव दर्जाचे वर्ग-१ श्रेणीचे अधिकारी | १०० |
| ४] सहाय्यक सचिव व अधीक्षक दर्जाचे अधिकारी | ८० |
| ५] वर्ग-२ [तांत्रिक] | ९० |
| ६] वर्ग-२ [अतांत्रिक] | ८० |
| ७] वर्ग-३ [तांत्रिक | ४० |
| ८] वर्ग-३ [अतांत्रिक] | ३० |

वरील देय प्रमाणकात अभिलेखासाठी लागणारी जागा अंतर्भूत आहे. बृहन्मुंबईमधील सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची बसण्याची व्यवस्था या सुधारित प्रमाणकाप्रमाणे करावी. कोणतेही अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना या देय प्रमाणकापेक्षा जास्त जागा नाही याची जबाबदारी त्या कार्यालय प्रमुखावर राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
[ भा. रा. सोंडूर ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

Scanned by CamScanner